आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

९ मे २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीसाठी राज्यात १ हजार १२१ उमेदवार रिंगणात, सर्वाधिक बीडमध्ये तर सर्वात कमी रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघात

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज पद्म पुरस्कारांचं वितरण

- राष्ट्रीय पोषण संस्थेकडून देशातल्या नागरिकांसाठी आहाराचे नवे दिशानिर्देश जारी

- एअर इंडिया एक्सप्रेसची ७० विमानं आजही रद्द, २५ कर्मचारी बडतर्फ

**आणि**

- FIH हॉकी प्रो लीग स्पर्धेसाठी हॉकी इंडियाकडून २४ जणांच्या भारतीय संघांची घोषणा

**<><><><><><>**

सध्या सुरू असलेल्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात १ हजार १२१ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. गेल्या वेळेच्या ८६७ उमेदवारांच्या तुलनेत त्यात २९ टक्क्यांची वाढ झाली असली तरी १३ विद्यमान खासदारांना मात्र यंदा लोकसभेत जाण्याची संधी मिळणार नाही. यंदाच्या उमेदवारांचं अधिक विश्लेषण आमच्या प्रतिनिधींकडून आता ऐकूया...

**व्हाइस कास्ट**

*गेल्या लोकसभा निवडणुकीप्रमाणेच यंदाही बीडमधून सर्वाधिक उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. गेल्यावेळी ३६ उमेदवार उभे राहिलेल्या बीड मतदारसंघात यंदा*

*४१ जण नशीब आजमावत आहेत. २०१९ च्या निवडणुकीत गडचिरोलीत सर्वात कमी म्हणजे ५ उमेदवार रिंगणात होते. यंदा रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघात सर्वात कमी ९ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. या लोकसभा निवडणुकीत बारामतीमधून ३८ औरंगाबाद आणि अमरावतीमध्ये ३७ आणि पुण्यातून ३५ उमेदवार रिंगणात आहेत. परभणी, मावळ, हिंगोली, शिरुर, माढा, नाशिक आणि उस्मानाबादमधल्या उमेदवारांची संख्या ३१ ते ३४ च्या दरम्यान आहेत. कमी उमेदवार संख्या असलेल्या मतदारसंघांमध्ये गडचिरोली, पालघर, दिंडोरी यांचा समावेश होतो. या तिनही ठिकाणी १० उमेदवार रिंगणात आहेत. नंदूरबारमध्ये ११ आणि रायगडमध्ये १३ उमेदवार नशीब आजमावत आहेत. रायगडवगळता इतर चारही मतदारसंघ अनुसुचित जमातींसाठी राखीव आहे, हे विशेष.*

*२०१९ मध्ये ८६७ उमेदवारांनी निवडणूक लढवली होती त्यातल्या ७९ महिला होत्या. २०१४ मध्ये ८९७ उमेदवार आणि २००९ च्या निवडणुकीत ८१९ उमेदवारांनी निवडणूक लढवली होती. २००९ मध्ये ५५ तर २०१४ मध्ये ६९ महिला आणि एका तृतीयपंथीय उमेदवारानं लोकसभा निवडणुकीत मतदारांचा कौल घेतला होता.*

**<><><><><>**

अपरिपक्वतेचं कारण देत बहुजन समाज पार्टीच्या प्रमुख मायावती यांनी आकाश आनंद यांना राष्ट्रीय समन्वयक पदावरुन दूर केलं आहे. अखेरपर्यंत पक्ष आणि समाजासाठी काम करत राहणार असून मायावती यांच्या आदेशाचा पालन करणार असल्याची प्रतिक्रिया आनंद यांनी दिली आहे.

**<><><><><>**

दिल्लीत राहणाऱ्या काश्मिरी निर्वासितांना लोकसभा निवडणुकीत मतदान करण्यासाठी निवडणुक आयोगाने दिल्लीत विविध ठिकाणी विशेष मतदान केंद्रं उभारली आहेत. या मतदान केंद्रांवर मतदान करण्यासाठी पात्र काश्मिरी निर्वासितांना मोफत वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश निवडणूक आयोगाने दिले आहेत.

**<><><><><><>**

तेलंगणामधे एमआयएम, भारत राष्ट्र समिती आणि काँग्रेस यांनी अनुनयाच्या राजकारणावर भर दिला आहे, अशी टीका केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केली आहे. ते आज तेलंगणामधे भोंगीर लोकसभा मतदारसंघात भाजपा उमेदवाराच्या प्रचारसभेत बोलत होते. यंदाची निवडणूक मोदी यांची विकासाची हमी आणि राहुल गांधी यांची स्वतःच्या कुटुंबाच्या कल्याणाची हमी यांच्यामधे होत आहे, असं अमित शहा म्हणाले. भारत राष्ट्र समितीनं राज्यात १० वर्षाच्या सत्ता काळात फक्त स्वतःच्या वैयक्तिक हिताची काळजी घेतली, अशी टीका त्यांनी केली.

तेलंगणातल्या नरसापूर आणि सरुरनगर मधे काँग्रेस नेते राहुल गांधी आज संध्याकाळी सभा घेणार आहेत. माजी मुख्यमंत्री चंद्रशेखर राव करीमनगरमधे रोड शो करणार आहेत.

**<><><><><><>**

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमात आजच्या भागात आपण ‘पालघर’ लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज राष्ट्रपती भवनात दुसऱ्या टप्प्यात पद्म पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत. त्यात सामाजिक कार्यकर्ते शंकरबाबा पापळकर यांचा समावेश आहे. या आधी २२ एप्रिलला राष्ट्रपतींनी तीन पद्मविभुषण, आठ पद्मभूषण तसंच ५५ जणांना पद्मश्री पुरस्कार प्रदान केले होते.

**<><><><><><>**

राष्ट्रीय पोषण संस्थेनं भारतीयांसाठी आहाराचे नवे दिशानिर्देश प्रसिद्ध केले आहेत. त्यात शारीरिकदृष्ट्या कार्यक्षम राहणं, नियमित व्यायाम करणं, मीठाचा वापर मर्यादित ठेवणं, अतीमेदयुक्त पदार्थ, साखर आणि अति प्रक्रिया केलेल्या पदार्थांचा कमी वापर अशी शिफारस या दिशानिर्देशांमध्ये केलेली आहे. यामुळं पोटाचा घेर वाढणे, वजन वाढणे आणि लठ्ठपणा यावर मात करता येईल, असं हैदराबादस्थित राष्ट्रीय पोषण संस्थेनं म्हटलं आहे. यामध्ये सुदृढ आरोग्याला चालना आणि सर्व वयोगटांमध्ये आजाराला आळा घालण्यावर यात भर दिला आहे. सर्व वयोगटातल्या नागरिकांनी दररोज किमान अर्धा ते पाऊण तास व्यायाम करावा. अधिक वजन किंवा लठ्ठपणा असलेल्या मुलांनी १ तास व्यायाम करावा असा सल्लाही राष्ट्रीय पोषण संस्थेनं दिला आहे. दररोज ५ ग्रॅमपेक्षा अधिक मीठ खाऊ नये आणि लहानपणापासूनच कमी मीठाचे पदार्थ खाण्याची सवय लावावी असंही यात नमूद आहे.

गेल्या काही दशकांमध्ये भारतीयांच्या खाण्याच्या पद्धतीत अनेक बदल झाले आहेत आणि त्यामुळं असंसर्गजन्य आजारांचा धोका वाढल्याचं ICMR चे महासंचालक डॉ. राजीव बहल या अहवाल जारी करताना म्हणाले. पोषण आहाराचे नवे दिशानिर्देश बदलत्या सवयी लक्षात घेऊन तयार केले असून त्यात अंमलबजावणी करता येईल, अशा शिफारसी केलेल्या आहेत.

<><><><><><>

एअर इंडिया एक्स्प्रेसनं कामावर न येणाऱ्या केबिन क्रू श्रेणीतल्या २५ वरिष्ठ कर्मचाऱ्यांना बडतर्फ केलं आहे. ७ मे रोजी हे कर्मचारी अचानक आजारपणाच्या सुटीवर गेले होते. त्यामुळं कंपनीला ८० हून अधिक उड्डाणं रद्द करावी लागली होती. आजही कंपनीनं ७० उड्डाणं रद्द केली. एअर इंडियाच्या मदतीनं २० मार्गांवर एअर इंडिया एक्स्प्रेस २९२ उड्डाणं करत आहे. पण येत्या काही दिवसात काही उड्डाण रद्दं करावी लागतील, अशी शक्यता एअर इंडिया एक्सप्रेसचे मुख्य कार्यपालन अधिकारी आलोक सिंह यांनी दिली आहे. तिकिटाचे पैसे परत घेण्यासाठी किंवा विमानाची वेळा नव्यानं निश्चित करण्यासाठी कंपनीशी संपर्क करण्याचं आवाहन एअर इंडिया एक्स्प्रेसनं केलं आहे. पूर्वीची एअर एशिया ही कंपनी एअर इंडिया एक्स्प्रेसमध्ये विलिन करण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे गेल्या काही काळापासून कंपनीचे कर्मचारी नाराज असल्याचं वृत्त आहे.

<><><><><><>

केंद्रीय लोकसेवा आयोगानं घेतलेल्या भारतीय वन सेवा परीक्षेत, लातूरच्या प्रतिक्षा काळे यांनी महाराष्ट्रात पहिला तर देशात दुसरा क्रमांक पटकावला आहे. सध्या त्या मेळघाटात वन अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

दरम्यान, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा येत्या सहा जुलै रोजी आयोजित करण्यात आली आहे. या परीक्षेमधून भरावयाच्या विविध संवर्गातल्या एकूण ५२४ पदांचा सुधारित सविस्तर तपशील आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

<><><><><><>

सीबीआयने दिल्लीतल्या राम मनोहर लोहिया रुग्णालयात वैद्यकीय घोटाळ्यासंदर्भात दोन हृदयरोग तज्ज्ञांसह ११ जणांना अटक केली आहे. आरोपींवर वैद्यकीय उपकरणांच्या पुरवठादारांकडून पैसे घेणे, डाॅक्टरांच्या भेटीसाठी रुग्णांकडून लाच घेणे आणि बनावट वैद्यकीय प्रमाणपत्र तयार करणे हे आरोप आहेत. सीबीआयने यासंदर्भात १५ ठिकाणी छापे टाकले असून पंधरा जणांविरुद्ध दोन एफआयआर नोंदवले आहेत.

<><><><><>

पाकव्याप्त काश्मीर भारतात परत यावा, यासाठी देशातले सर्व राजकीय पक्ष कटीबद्ध आहे, असं परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीतल्या गार्गी कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांशी ते काल संवाद साधत होते. कलम ३७० कधीही हटू शकणार नाही, असं लोकांना वाटतं होतं. पण ते हटवल्यानंतर पाकव्याप्त काश्मीरचा विचार लोकांच्या मनात हा आल्याचा दावा त्यांनी केला.

<><><><><>

परराष्ट्र सचिव विनय मोहन क्वात्रा यांनी आज सकाळी बांग्लादेशाच्या प्रधानमंत्री शेख हसीना यांची ढाक्यामध्ये भेट घेतली. बांग्लादेशाचे परराष्ट्र मंत्री हसन महमूद यांनाही ते भेटले. कालपासून क्वात्रा बांग्लादेश दौऱ्यावर आहेत. या भेटींदरम्यान द्विपक्षीय मुद्दे, राजकीय, सामाजिक परिस्थिती, व्यापार आणि गुंतवणुकीच्या मुद्द्यांवर चर्चा होण्याची शक्यता आहे.

<><><><><>

FIH हॉकी प्रो लीग स्पर्धेसाठी हॉकी इंडियानं २४ जणांच्या भारतीय संघांची आज घोषणा केली. हरमनप्रीत सिंह या संघाचा कर्णधार असून हार्दिक सिंह उपकर्णधार आणि श्रीजेश रवींद्रन गोलकीपर आहे. पहिल्या टप्प्यात बेल्जियममध्ये २२ मे ते

३० मे दरम्यान ही स्पर्धा होईल. दुसऱ्या टप्प्यात इंग्लंडमध्ये १ जून ते १२ जून दरम्यान स्पर्धा सामने होतील. ८ सामन्यांमधून १५ गुण मिळवून भारतीय संघ गुणपत्रिकेत तिसऱ्या स्थानी आहे.

//<><><><><><>//